Publication: Pudhari
Date: 1/3/2020
Page: 2
Column: 1-3

पुढारी महामुंबई मुंबई, रविवार, १ मार्च २०२०

# एईएमएलतर्फे सेफ्टी प्लस स्वच्छतागृह कार्यक्रम

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

अदाणी फाऊंडेशन आणि अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) मुंबई महापालिकेच्या मदतीने मुंबईतील २,२६९ शाळांमध्ये नुकताच सेफ्टी प्लस स्वच्छाग्रह हा तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक उपस्थित होते. हे शिक्षक व मुख्याध्यापक स्वच्छतागृह प्रेरकांची भूमिका घेऊन विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची संस्कृती निर्माण करण्यासाठी व मुलांसाठी सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले.

अदानी फाऊंडेशनच्या विश्वस्त शिलिन आर. अदानी यांनी सांगितले की, स्वच्छतागृह अनेक शालेय मुलांपर्यंत पोहोचण्यास सज्ज आहे. ही अभिमानाची बाब आहे. ही मुले आमच्या देशाचे भावी नागरिक आहेत. त्यांच्यात परिवर्तनाची क्षमता तर आहेच, शिवाय ते स्वत:च्या उदाहरणातून नेतृत्व करू शकतात आणि लोकांचे वर्तन बदलण्यासाठी त्यांच्यावर प्रभाव टाकू शकतात.

घरानंतर मुले शाळेतच जास्तीत-जास्त वेळ घालवतात आणि म्हणूनच शाळेतील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची सुरक्षितता हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. याच काळजीपोटी एईएमएल आणि अदाणी फाऊंडेशनने शाळेच्या आतील व शाळेबाहेरील सुरक्षिततेच्या अंगांबाबत एक सुरक्षितता माहितीपत्रक तयार केले आहे. जेणेकरून त्यांना या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अपघात व जखमी होण्याच्या प्रकारांचा प्रतिकार करता येईल तसेच त्या घटना कमी करता येतील.